08-03-2024-Dai-03 New_DH_PAN_20_08_2016-3.qxp 03/07/2024 10:23 PM Page 1



## निवडक

### पेडणे भंडारी समाजबांधवांची उद्या बैठक

■ टीम दैनिक हेराल्ड

**पेडणे, दि. ७ :** तालुक्यातील भंडारी समाज बांधवांची बैठक शनिवार दि. ९ मार्च रोजी दुपारी ३.३० वाजता गडेकर – भाटले येथे आयोजित करण्यात आली आहे. या बैठकीत समाजाला भेडसावणाऱ्या विविध समस्यांबाबत चर्चा करण्यात येणार आहे. समाजातील राजकीय व्यक्तींना तसेच समाज कार्यकर्त्यांना राज्यकर्त्याकडून वेळोवेळी दुय्यम दर्जाची वागणूक देण्यात येत आहे. गोव्यात भंडारी समाज मोठ्या संख्येने असून या समाजाला योग्य तो मानसन्मान मिळावा यावरही या बैठकीत चर्चा होणार आहे. गोव्यातील भंडारी समाजाचे नेते या बैठकीत मार्गदर्शन करणार आहेत. पेडणे तालुक्यातील समाजबांधवांनी या बैठकीला मोठ्या संख्येने उपस्थित रहावे, असे आवाहन उमेश तळवणेकर यांनी केले आहे.

---

### विविधा विद्यालयात उद्या सत्कार सोहळा

■ टीम दैनिक हेराल्ड

**साखळी, दि. ७ :** न्हावेली – साखळी येथील विविधा विद्या प्रतिष्ठानच्या व्ही. आर. गावस मेमोरियल उच्च माध्यमिक विद्यालयात शनिवार, दि. ९ मार्च रोजी चार यशस्वी महिलांचा सत्कार करण्यात येणार आहे. विद्यालयाच्या वातानुकूलित सभागृहात सकाळी ११.४५ वा. आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून पाळी मतदारसंघाचे माजी आमदार तथा विविधा ग्रुपचे चेअरमन प्रताप गावस, विद्यालयाचे प्राचार्य रमेश सिनारी ,कार्यक्रमाचे समन्वयक एकनाथ मांद्रेकर, ज्येष्ठ शिक्षिका स्मिता फडते, राखी शिरोडकर व ज्येष्ठ शिक्षक बाबू नाईक, शिक्षकेतर महिला कर्मचारी अश्विनी गावस उपस्थित राहणार आहेत. यावेळी पोलिस उपनिरीक्षक प्रगती मळीक, व्हिजन हॉस्पिटलच्या होमिओपॅथिक डॉ. स्नेहल खांडेकर, गोवा मेडिकल कॉलेज बांबोळीच्या स्टाफ नर्स शिल्पा सावंत व सरकारी माध्यमिक विद्यालय बाळ्ळीच्या सहाय्यक शिक्षिका लीना गावस देसाई यांना त्यांच्या कार्याबद्दल सन्मानित केले जाईल. त्यानंतर विविधरंगी मनोरंजनात्मक कार्यक्रम सादर होणार आहेत.

---

### शांतादुर्गा चामुंडेश्वरी देवस्थानच्या अध्यक्षपदी प्रशांत धामस्कर

■ टीम दैनिक हेराल्ड

**कुडतरी, दि. ७ :** श्री शांतादुर्गा चामुंडेश्वरी महामाया देवस्थान कुडतरीची वार्षिक सर्वसाधारण सभा होऊन सन २०२४–२६ या दोन वर्षांच्या कालावधीसाठी नवीन कार्यकारिणी समितीची बिनविरोध निवड करण्यात आली. कार्यकारिणीच्या अध्यक्षपदी प्रशांत धामस्कर यांची निवड केली आहे. नवीन समितीचे इतर पदाधिकारी पुढीलप्रमाणे : उपाध्यक्ष : गजानन शिरोडकर, सचिव : चंदनदास खोलकर, खजिनदार : मुकुंद परब, सदस्य : कृष्णनाथ जल्मी, महादेव भंडारी, दयानंद आंयकर, संजीव बेळगुंडकर व शोधन शिरोडकर.

---

### मडगाव रवींद्र भवनात आज स्वरानंद

■ टीम दैनिक हेराल्ड

**मडगाव, दि.७ :** मडगाव रवींद्र भवन आयोजित स्वरानंद कार्यक्रमात दि. ८ रोजी संध्याकाळी ६.१५ वा. सौरभ मुखर्जी आणि नम्रता जोशी यांचे शास्त्रीय गायन होईल. सौरव मुखर्जी यांनी खैरागढ़ विद्यापीठातून परफर्मींग आर्ट्समध्ये पदवी घेतली असून ते सध्या गोवा संगीत महाविद्यालयात मास्टर्स ऑफ आर्ट्स पूर्ण करत आहेत. नम्रता जोशी या गोमंतकात एक गुणी कलाकार म्हणून नावलौकिक मिळवत आहेत. त्यांनी श्रीधर पार्सेकर संगीत संमेलन, संवादी संगीत संस्था, आदी आपले गायन प्रस्तुत केले आहे. तसेच काही शॉर्ट फिल्म्स आणि संगीत सीडीसाठी त्यांनी पार्श्वगायन केले आहे. सौरभ मुखर्जी आणि नम्रता जोशी हे दोन्ही कलाकार आपले 'मास्टर्स ऑफ परफर्मींग आर्ट्स' डॉ. शिल्पा दुबळे परब यांच्या मार्गदर्शनाखाली पूर्ण करत आहेत. स्वरानंद या उपक्रमांतर्गत संगीताशी निगडित कार्यक्रम सादर केले जातात. हा उपक्रम रवींद्र भवन मागचे दोन महिने राबवित आहे. उदयोन्मुख कलाकारांना एक व्यासपीठ मिळवून देण्यास तसेच इतर सर्व हरहुन्नरी कलाकारांसाठी हा उपक्रम असून, प्रेक्षकांनी उपस्थित राहून कलाकारांना प्रोत्साहन द्यावे, असे रवींद्र भवनतर्फे कळविण्यात येत आहे.

---

### कोलवाळ श्रीराम पंचायतन देवस्थानात महाशिवरात्री उत्सव

■ टीम दैनिक हेराल्ड

**म्हापसा, दि. ७ :** कोलवाळ येथील श्रीराम पंचायतन देवस्थानात उद्या शुक्रवार, दि. ८ मार्च रोजी महाशिवरात्री उत्सव विविध धार्मिक आणि सांस्कृतिक कार्यक्रमांनी साजरा करण्यात येणार आहे. यानिमित्त सकाळी ८ वा. गणेश पूजन, अभिषेक, लघुरुद्र, नंतर आरती व तीर्थप्रसाद, दुपारी १२ वा. तळेश्वर भजनी मंडळ, कोणीवाडा–कोलवाळतर्फे भजन होईल. यात प्रेमानंद कांबळी, विजय कांबळी, वासुदेव च्यारी भजन सादर करतील. त्यांना हार्मोनियम व तबलासाथ मयूर सातोस्कर व निशिकांत कळंगुटकर करणार आहेत. रात्री ८ वा. पुणे येथील कीर्तनकार ह.भ.प. संदीप बुवा मांडके यांचे किर्तन होणार आहे. त्यांना तबलासाथ संकेत खलप व हार्मोनियमवर विद्याधर नाईक संगीतसाथ करणार आहेत.

---

### मांद्रेत आज 'गाव झालो जाणटो'

■ टीम दैनिक हेराल्ड

**हरमल, दि. ७ :** महाशिवरात्रीनिमित्त श्री बांदेश्वर देवस्थानात शुक्रवार, दि. ८ रोजी रात्री ८ वाजता कलाचेतना वळवई निर्मित व अमोघ बुडकुले दिग्दर्शित 'गाव झालो जाणटो' नाटक सादर होणार आहे.
या नाटकाचे लेखक सुचिता नार्वेकर असून या नाटकात मोहनदास नायक, राजेश लोहिया, रामानंद नायक, निगम नायक, प्रशांती च्यारी, सुचिता नार्वेकर व राजदीप नायक यांच्या भूमिका आहेत. तत्पूर्वी सकाळी ९ वाजता अभिषेक, दुपारी १२ वाजता आरती व तीर्थप्रसाद होईल. भाविकांनी उपस्थित राहून सहकार्य करावे, असे आवाहन श्री देवस्थान समितीचे विनोद नाईक, प्रसाद शहापूरकर व देवेश नाईक यांनी केले आहे.

---

### भूमिका प्राथमिक विद्यालयात उद्या बाजार दिन

■ टीम दैनिक हेराल्ड

**साखळी, दि. ७ :** पर्ये–सत्तरी येथील श्री भूमिका शिक्षण संस्थेच्या श्री भूमिका प्राथमिक विद्यालयाचा बाजार दिन शनिवार दि.९ मार्च रोजी सकाळी ९.३० ते दुपारी १२.३० या वेळेत विद्यालयाच्या आवारात आयोजित करण्यात आला आहे. या बाजारात घरगुती पदार्थ तसेच भाजीपाला व अन्य पदार्थ उपलब्ध असणार आहेत. विद्यार्थ्यांना बेरीज–वजाबाकी समजावी, यातून मुले व्यावहारिक ज्ञान घेऊन पुढे जावीत हा हेतू ठेऊन या बाजार दिनाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमाच्या उद्घाटनाला श्री भूमिका उच्च माध्यमिक विद्यालयाचे प्राचार्य यशवंत सावंत उपस्थित राहणार आहेत.

# रस्त्याकडेची भंगारअवस्थेतील वाहने हटविणार !

## फोंडा पालिकेच्या बैठकीत निर्णय | मास्टरप्लॅनला मंजुरी



फोंडा : पालिकेच्या बैठकीत उपस्थित असलेले कृषिमंत्री रवी नाईक, नगराध्यक्ष रितेश नाईक व इतर.

■ टीम दैनिक हेराल्ड

**फोंडा, दि. ७ :** फोंडा पालिकेच्या २०२४–२५ सालासाठी ३६,२२,२१,८०० रुपयांच्या अंदाजपत्रकाला मंजुरी, शहरांतील रस्त्याच्या बाजूला भंगारअवस्थेत असलेली वाहने काढण्याचा, तयार झालेल्या मास्टरप्लॅनला मंजुरी तसेच अन्य महत्त्वाचे ठराव गुरुवारी सकाळी झालेल्या पालिका मंडळाच्या बैठकीत घेण्यात आले.

नगराध्यक्ष रितेश नाईक यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या बैठकीला कृषी मंत्री रवी नाईक, उपनगराध्यक्ष दिपा कोलवेकर, मुख्याधिकारी योगिराज गोसावी व अन्य नगरसेवक उपस्थित होते.

**'त्या' चालकांना पुन्हा तातडीने बोलविणार**

**फोंडा पालिकेचा मास्टर प्लॅन आराखडा तयार झाला असून त्याला मंजुरी देण्यात आली आहे. लवकरच पुढील प्रक्रिया सुरू केली जाणार आहे. तसेच पालिकेचे काही चालक निवडणुकीवेळी इतर खात्याच्या अधिकाऱ्यांसाठी नेण्यात आले होते. त्या चालकांना पुन्हा तातडीने माघारी बोलविण्याचा निर्णय पालिका मंडळाने घेतला असल्याचे नगराध्यक्ष नाईक यांनी सांगितले.**

बैठकीनंतर नगराध्यक्ष रितेश नाईक यांनी सांगितले की, फोंडा शहरात अनेक ठिकाणी भंगारअवस्थेत आलेली वाहने रस्त्याच्या बाजूला पडून आहे. वाहतुकीला अडथळा ठरणारी वाहने काढण्यासाठी वाहनमालकांना नोटीस पाठविली जाणार आहे. मालकांनी वाहने नेण्यात नकार दिल्यास पालिकेतर्फे वाहने काढून नेण्यात येणार असल्याचे सांगितले.

कृषी मंत्री रवी नाईक म्हणाले की, फोंडा पालिका क्षेत्रात भटक्या कुत्र्यांचा संचार वाढला आहे. त्यामुळे अपघात घडत असतात. तसेच भटक्या कुत्र्यांनी लोकांना चावे घेण्याचे प्रकारात भरमसाट वाढ झाली आहे. म्हणून कुर्टी येथे लवकरच भटक्या कुत्र्यांना लसीकरण करण्यासाठी खास सोय करण्यात येणार आहे. त्यासाठी जागा ताब्यात घेण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली असल्याचे सांगितले.

# उत्तरपत्रिकांचे फेरमूल्यांकन करण्याचा अधिकार कायम ठेवा

- 'एनएसयूआय'ची राज्यपालांकडे मागणी
- मूल्यमापन शुल्क प्रति पेपर १२०० रुपये करण्याची विनंती

■ टीम दैनिक हेराल्ड

**पणजी, दि. ७ :** नॅशनल स्टुडंट्स युनियन ऑफ इंडिया ( एनएसयूआय) च्या सदस्यांनी आज गुरुवारी राज्यपाल पी एस श्रीधरन पिल्लई यांची भेट घेऊन अध्यादेश 'ओ –ए २५' कायम ठेवण्याची विनंती केली. 'ओ –ए २५' मुळे विद्यार्थ्यांना त्यांनी परीक्षेत लिहिलेल्या उत्तरपत्रिकांचे फेरमूल्यमापन करण्याचा अधिकार आहे. मात्र, हा अध्यादेश रद्द करण्याची प्रक्रिया सुरू असल्यामुळे तो रद्द करू नये, अशी विनंती एनएसयूआयने राज्यपालांकडे केली आहे. तसेच मूल्यमापन शुल्क प्रति पेपर ५००० रुपयांवरून १२०० ते १५०० रुपये करण्याची विनंती केली आहे.

याबाबत एनएसयूआयचे अध्यक्ष नौशाद चौधरी म्हणाले की, विद्यार्थ्यांच्या परीक्षेच्या उत्तरपत्रिकेचे मूल्यमापन करण्यासाठी हा अध्यादेश एक महत्त्वपूर्ण साधन आहे. जेव्हा मूल्यमापन केले जाते, तेव्हा पेपर तपासताना राहिलेल्या अनेक त्रुटी समोर येतात. विद्यार्थ्यांचा हा विशेष अधिकार रद्द केल्यास तो अभियांत्रिकी, वैद्यकशास्त्र आणि कायद्याच्या विद्यार्थ्यांवर अन्याय होईल. 'ओए–२५' रद्द केल्याने विद्यार्थ्यांना समाधान मिळविण्याच्या संधीपासून वंचित राहावे लागेल आणि परीक्षा प्रणालीवरील विश्वास कमी होईल. आम्ही राज्यपालांना विनंती केली आहे की, हा अध्यादेश रद्द करण्यास संमती देऊ नये. याचा परिणाम आपल्या विद्यार्थी समाजावर होईल. जर आव्हान मूल्यमापन रद्द केले गेले तर पेपर तपासणीत चुका झालेल्या असतानाही विद्यार्थी नापास होतील. 'ओ –ए २५' नुसार करण्यात आलेल्या मूल्यमापनानंतर दोन मूल्यमापनांची सरासरी काढण्यापेक्षा विद्यार्थ्याने मिळवलेले सर्वोच्च गुण विचारात घेणे अत्यावश्यक आहे, अशीही एनएसयूआयची मागणी आहे. जर या मागण्या पूर्ण झाल्या नाहीत तर हा मुद्दा प्रत्येक कॉलेजमध्ये घेऊन जनजागृती करण्याचा निर्धार एनएसयूआयने व्यक्त केला आहे.



# मुरगाव म्युनिसिपल हायस्कूलचे नामांतर होणार

- मुरगाव पालिकेच्या मंडळाच्या बैठकीत निर्णय

■ टीम दैनिक हेराल्ड

**वास्को,दि.७ :** येथील म्युनिसिपल हायस्कूलचे नामांतर करण्याचा ठराव मुरगाव पालिका मंडळाच्या सर्वसाधारण बैठकीत आज गुरुवारी घेण्यात आला. म्युनिसिपल हायस्कूलचे मार्मुगोवा म्युनिसिपल कौन्सिल मनोहर पर्रीकर हायस्कूल असे नामांतर करण्यात येणार आहे. सदर ठराव शिक्षण खात्याला पाठविण्यात येणार आहे. तेथील मान्यतेनंतर नामांतर होणार आहे, अशी माहिती म्युनिसिपल विद्यालयाच्या व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष तथा नगरसेवक यतीन कामुर्लेकर यांनी दिली.

मुरगाव पालिकातर्फे चालविण्यात येणारे म्युनिसिपल हायस्कूल हे गोव्यातील एकमेव म्युनिसिपल विद्यालय आहे. मुरगाव पालिकेच्या कार्यालयीन इमारतीमध्ये या विद्यालयाचे पहिली ते दहावीपर्यंतचे वर्ग भरतात. सदर विद्यालयाचे नामांतर करण्याचा प्रस्ताव यतीन कामुर्लेकर यांनी ठेवला होता.त्यासंबंधी बैठक होऊन सदर प्रस्ताव स्विकारण्यात आला. विद्यालयाचे नामांतर होणार असल्याबद्दल कामुर्लेकर यांनी आनंद व्यक्त केला.

# बिर्ला चौक ते दाबोळी चौक उड्डाणपूल रखडले ?

- नौदलाचा अडथडा
- उंच इमारतींना कोणी परवानगी दिली, हे स्पष्ट करावे : गुदिन्हो

■ टीम दैनिक हेराल्ड

**वास्को, दि. ७ :** नौदलाच्या असहकार्यामुळे बिर्ला चौक ते दाबोळी चौकदरम्यान बांधण्यात येणाऱ्या नियोजित उड्डाणपुलाच्या बांधकामासमोर अडचणी उभ्या राहिल्या आहेत. तसेच फनेल झोनमधील घरबांधणीसाठी परवानगी दिल्यावरही तीच बांधकामे मोडण्यासाठी पुढाकार घेणाऱ्या नौदलाच्या भूमिकेबद्दल लोकांमध्ये नाराजी आहे. यासंबंधी नुकतेच गोवा भेटीवर आलेले संरक्षणमंत्री राजनाथ सिंग यांच्याकडे सदर समस्या आपण मांडल्या असल्याचे पंचायतमंत्री माविन गुदिन्हो यांनी सांगितले. नौदलाने स्वतःच्या वसाहतीमध्ये उंच इमारती बांधल्या आहेत. त्यासाठी त्यांनी कोणाकडून परवानगी घेतल्या होत्या. त्यासंबंधी स्पष्टीकरण नौदलाने द्यावे, असे आवाहन त्यांनी केले.

बिर्ला चौक ते दाबोळी चौक दरम्यानच्या महामार्गावरील वाहतूक वाढल्याने तसेच दुतर्फा लोकवस्ती असल्याने लोकांना रस्ता ओलांडताना अपघाताला सामोरे जावे लागण्याची भीती आहे. यासाठी बिर्ला चौक ते दाबोळी चौक दरम्यान उड्डाण पुल बांधण्याचा प्रस्ताव मी व मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत यांनी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्यासमोर ठेवला होता. त्यांनी सदर उड्डाण पुल बांधण्यासाठी साडेपाचशे कोटी रुपये मंजूर केल्यावर निविदाही काढण्यात आली आहे. त्यामुळे बांधकामाला आरंभ होणार होता. तथापि, नौदलाच्या असहकार्यामुळे कामामध्ये अडथळे आले आहेत. नौदलाने काही वर्षापूर्वी भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाच्या सुमारे दोन हजार चौरस मीटर जमिनीवर अतिक्रमण करून आपल्या हद्दीत घेतली आहे. यासंबंधी अलिकडेत जिल्हाधिकारी, सरकारी अधिकारी, नौदल अधिकारी यांच्यासमवेत झालेल्या बैठकीत नौदलाने सदर जागा पुन्हा राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाला देण्याची तयारी दर्शविली होती. मात्र, आता नौदल सहकार्य करण्यास तयार नाही. प्राधिकरणाने स्वखर्चाने नौदलाचे कुंपण, गटार बांधून देण्याची तसेच केबल दुसरीकडे स्थलांतर करण्यास तयारी दाखविली होती परंतु, आता नौदलाने तुम्ही जमीन संपादन करा, आम्ही देतो, अशी भूमिका घेतली. सदर जमीन संपादन करण्यासाठी काही वर्षे लागतील. तोपर्यंत उड्डाण पुलाचे बांधकाम थांबवावे काय, असा सवाल मंत्री गुदिन्हो यांनी उपस्थित केला आहे.

**नौदलाला परवानगीची गरज नाही ?**

**नौदलाने येथील काही घरमालकांना बांधकामाची उंची तीन मीटर्स ठेवण्यासाठी परवानगी दिली होती. आता ती दीड मीटर ठेवा, असे सांगून उर्वरित बांधकाम पाडले जात आहे. नौदलाने स्वतः उंच इमारती बांधल्या आहेत. त्याच्यासाठी एक कायदा व सर्वसामान्यांसाठी एक कायदा होऊ शकतो काय, असा प्रश्न गुदिन्हो यांनी विचारला. नौदलाने उंच इमारती बांधण्यासाठी स्थानिक प्रशासनाकडून कोणत्या परवानग्या घेतल्या आहेत. त्यांचे कागदपत्रे दाखवावेत किंवा नौदलाला इमारती बांधण्यासाठी स्थानिक प्रशासनाच्या परवानगीची गरज नाही हे स्पष्ट करावे, असे त्यांनी आवाहन केले.**

# इव्हेंटवर करोडो खर्च मात्र ; रवींद्रबाबांची शताब्दी साजरी करण्यासाठी पैसे नाहीत

- महान गोमंतकीयांचा आदर करायला शिकण्याचा युरी आलेमाव यांचा सल्ला

■ टीम दैनिक हेराल्ड

**मडगाव, दि. ७ :** इव्हेंट आयोजनावर करोडो रुपये खर्च केले जातात. दुर्दैवाने, बौद्धिकदृष्ट्या दिवाळखोर भाजप सरकारचे मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत यांच्याकडे ज्ञानपीठ पुरस्कार विजेते रवींद्रबाब केळेकर यांच्या जन्मशताब्दीनिमित्त वर्तमानपत्रात जाहिराती प्रसिद्ध करण्यासाठी आणि राज्यस्तरीय कार्यक्रम आयोजित करण्यासाठी पैसे नाहीत. महान गोमंतकीयांचा आदर करायला शिका!, अशी बोचरी टिका विरोधी पक्षनेते युरी आलेमाव यांनी केली आहे. गोव्यातील नामवंत कोकणी कवी आणि लेखक मनोहरराय सरदेसाई आणि ज्ञानपीठ पुरस्कार विजेते रवींद्रबाब केळेकर यांच्या जन्मशताब्दी वर्षाची मी सरकारला आठवण करून दिली होती. गोव्यातील अशा महान गोंयकारांकडे सरकारने दुर्लक्ष केले हे खेदजनक आहे, असे युरी आलेमाव यांनी म्हटले आहे. राज्यपाल पी.एस. श्रीधरन पिल्लई यांनी रवींद्रबाबांची शताब्दी २०२४ मध्ये सुरू होत आहे, हे सत्य स्वीकारले आणि रवींद्र केळेकर यांच्या शताब्दी वर्षाच्या प्रारंभी आज प्रियोळ येथे रस्त्याच्या नामकरण समारंभासाठी प्रमुख पाहुणे म्हणून येण्याचे आमंत्रण स्वीकारले याचा मला आनंद आहे, असे युरी आलेमाव म्हणाले. मी मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत यांना विनंती करतो की त्यांनी वस्तुस्थिती व आकडेवारी नीट समजत असलेल्या व्यक्तींकडूनच सल्ला घ्यावा आणि तारखा आणि वर्षांची गफलत करणे थांबवावे. डॉ. प्रमोद सावंत यांनी मनोहरबाब आणि रवींद्रबाबांची शताब्दी २०२५ मध्ये सुरू होत असल्याचा दावा केला होता तेव्हा मी गेल्या विधानसभा अधिवेशनात त्यांची चूक दाखविली होती, असे युरी यांनी नमूद केले. सरदेसाई आणि केळेकर यांच्या जन्मशताब्दीचा सरकारने तात्काळ वर्षभराचा कार्यक्रम तयार करावा, असा सल्ला त्यांनी दिला.

**निवडक दृष्टिकोन थांबवा**

**गोव्यासाठी योगदान दिलेल्या महान गोमंतकीयांचा सन्मान करणे ही सरकारची जबाबदारी आहे. सरकारला राष्ट्रीय वीरांच्या नावाने उत्सव आयोजित करताना महान गोंयकारांकडे दुर्लक्ष करण्याचा अधिकार नाही. मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत यांनी त्यांचा निवडक दृष्टिकोन थांबवावा आणि संघ प्रचारक म्हणून नव्हे तर मुख्यमंत्री म्हणून कर्तव्य बजावावे, असा जबरदस्त टोला युरी यांनी हाणला आहे.**

# कारापूर– सर्वण सरपंचांवरील अविश्वास ठराव संमत

■ टीम दैनिक हेराल्ड

**डिचोली, दि. ७ :** कारापूर –सर्वण पंचायतीचे सरपंच दत्तप्रसाद यांच्या विरोधात दाखल करण्यात आलेल्या अविश्वास ठराव सात विरुद्ध शून्य मतांनी संमत करण्यात आल्याची माहिती डिचोली गटविकास कार्यालयातून देण्यात आली.

आज पंचायत कार्यलयात झालेल्या विशेष बैठकीत सात पंच उपस्थित होते. तसेच चार पंचायतसदस्य गैरहजर राहिल्याने हा ठराव सात विरुद्ध शून्य मतांनी संमत करण्यात आला. निर्वाचन अधिकारी या नात्याने गटविकास कार्यलयाचे अधिकारी प्रताप राणे यांची उपस्थिती होती.





# थिवी स्टेशनवर परवाने द्या

## सिरसई टॅक्सी चालकांची मागणी | रॅली काढून मुख्यमंत्र्यांचे वेधले लक्ष

■ टीम दैनिक हेराल्ड

**पणजी, दि. ७ :** सिरसई टूरिस्ट टॅक्सी असोसिएशनने गुरुवारी थिवि रेल्वे स्थानकावर रॅली काढली. थिवी स्थानकावर कायमस्वरूपी टॅक्सी परवाना मिळावा आणि थिवी रेल्वे स्टेशनवर नवीन पिवळ्या/काळ्या टॅक्सी काउंटरची स्थापना करावी, अशी या टॅक्सीचालकांची मागणी आहे.

टॅक्सी चालकांच्या म्हणण्यानुसार सिरसईमधील काही टॅक्सी ऑपरेटर वीस वर्षांपासून टुरिस्ट टॅक्सी चालवत आहेत. असे असूनही त्यांना थिवी रेल्वे स्थानकावर टुरिस्ट टॅक्सी चालवण्याचा कोणताही कायदेशीर अधिकार नाही. थिवी स्टेशनवर प्रवाशांचा वाढता ओघ लक्षात घेऊन रेल्वे स्थानकावर टॅक्सी काउंटर स्थापन करण्याची आवश्यकता असोसिएशनने अधोरेखित केली आहे. सध्या, फक्त थिवीमधल्या टॅक्सी चालकांना स्टेशनवर पर्यटकांना सेवा देण्याची परवानगी आहे, ज्यामुळे प्रवाशांना दीर्घकाळ प्रतीक्षा करावी लागते. प्रवाशांना उतरवल्यानंतर टॅक्सी परत येण्यासाठी पर्यटक अनेकदा तासभर थांबतात. त्यामुळे गैरसोय आणि निराशा निर्माण होते. याबाबत केंद्रीय मंत्री श्रीपाद नाईक यांना पाठवलेल्या अनेक निवेदने देऊनही अद्याप कोणतीही कारवाई झालेली नाही. त्यामुळे मुख्यमंत्र्यांनी हस्तक्षेप करून हा प्रश्न तातडीने सोडवावा, अशी विनंती टॅक्सी असोसिएशनने केली आहे.



थिवी : थिवी स्थानकावर कायमस्वरूपी टॅक्सी परवान्याची मागणी करताना टॅक्सीचालक.

